सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती - ४४४६०४
(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)
"Towards Global Technological Excellence"
फोन: ०७२१-२५३१९३०  फॅक्स: ०७२१-२५३१९३१
वेबसाइट: www.gcoea.ac.in  ईमेल: principal@gcoea.ac.in

**परिपत्रक तात्काळ**

जा. क्र. शाअमअ/आस्था-2अ/मत्तादायीत्व/2024-25/ 1436
दि. 4 /04/ 2025

**विषय :- मत्ता व दायित्व विवरणपत्र सादर करणेबाबत...**
**संदर्भ:-** 1) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. वशिअ/1214/प्रक्र.26/11, दि.02/06/2014
2) मा. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांचे परिपत्रक क्र.विकाअ/आस्था/2025/977 Dt. 02/04/2025

उपरोक्त संदर्भ व विषयानुसार या संस्थेतील सर्व विभाग प्रमुख, प्रभारी अधिकारी /कर्मचारी (वर्ग 4 कर्मचारी सोडुन) यांना कळविण्यात येते की, या परिपत्रकाचे अतिशय काटेकोरपणे वाचन करुन त्यानुसार **दि. 31/03/2025 चे स्थितीस अनुसरुन विवरणपत्रे दि. 17/04/2025 पर्यंत किंवा तत्पुर्वी सादर करावी.**

1. सन 2024-25 या वर्षाचे मत्ता व दायित्व विवरणपत्र सादर करणे सर्व वर्ग 4 कर्मचारी सोडुन सर्वांना बंधनकारक व सक्तीचे आहे.
2. मत्ता व दायित्व विवरणपत्र सादर करणे ही व्यक्तीगत जबाबदारी आहे.
3. विवरणपत्राचे नमुने संदर्भ क्र.1 च्या शासन निर्णयासोबत दिलेले असून शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या व संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सदर नमुने आपण आपल्या स्तरावर उपलब्ध करुन घ्यावेत आणि त्यानुसार कार्यवाही करावी.
4. या विवरणपत्रा अभावी गोपनीय अहवाल, वार्षिक वेतनवाढ, बदली/बढती/परिविक्षा प्रस्ताव/वैद्यकीय देयके, किंवा अन्य सेवाविषयक बाबी प्रभावीत होउ शकतात याची सर्वांनी नोंद घ्यावी.
5. सर्व विभाग प्रमुख, प्रभारी अधिकारी यांनी त्यांच्या नियंत्रणातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे एकत्रितरित्या यादी करुन सर्व अहवाल प्राप्त झाल्याची खात्री केल्यानंतरच ती सर्व बंद पाकीटे कार्यालयात जमा करावीत व त्याबाबतची त्या दिवशी आवक विभागात कार्यरत कर्मचा-याची पोच पावती घ्यावी.
6. मत्ता व दायित्व विवरणपत्रे वेळेवर जमा न करण्यामुळे होणा-या परिणामाची जबाबदारी ही व्यक्तीगत असणार आहे. कोणत्याही विलंबासाठी कार्यालय जबाबदार असणार नाही.

सर्व विभाग प्रमुख, प्रभारी अधिकारी यांनी याबाबत योग्य ती कार्यवाही वेळेवर करुन आपल्या तसेच आपल्या अधिनस्त सर्व अधिकारी / कर्मचारी यांचे विवरणपत्र वेळेत जमा करण्याबाबत कार्यवाही करुन सहकार्य करावे.

**सर्व वर्ग 1 चे अधिकारी यांनी त्यांचे मत्ता व दायित्व विवरणपत्रे बंद पाकीटात प्रति, मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई यांचे नावे व सर्व वर्ग 3 चे कर्मचारी यांनी त्यांचे मत्ता व दायित्व विवरणपत्रे बंद पाकीटात. प्रति, मा. सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांचे नावे सादर करावी.** पाकीटाच्या वरच्या भागात स्पष्ट भाषेत सन 2024-25 या वर्षाचे मत्ता व दायित्व याचे विवरणपत्र व डाव्या बाजुला स्वत:चे नांव पदनाम व स्वाक्षरी करुन गोपनीय स्वरुपात जमा करावीत.

प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,अमरावती

प्रत:- 1. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहिती सादर.
2. मा. सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना माहिती सादर.
3. विभाग प्रमुख स्थापत्य, उपयोजित यंत्रशास्त्र, यंत्र अभि., विद्युत, अणुविद्युत, उपकरणीकरण, संगणक,माहिती तंत्राज्ञान, रसायनशास्त्र,पदार्थ विज्ञान,गणित,कर्मशाळा,ग्रंथालय,परिक्षा नियंत्रक,धातुशास्त्र,वसतीगृह,कार्यालय,आस्थापना 2 ब यांना माहिती व आवश्यक कार्यवासाठी अग्रेषित.
4. श्रीमती अर्चना क. बैले, सहायक प्राध्यापक भुशास्त्र यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करीता.
5. प्रभारी अधिकारी डाटा सेंटर शा.अ.म.अमरावती यांना संस्थेच्या संकेतस्थळावर टाकण्याकरीता.